
सोनेरी कोंबडा

रशियन परीकथा






सोनेरी कोंबडा

रशियन परीकथा

चित्र

एव्हगेनी राचेव



कोणे एके काळी एक मांजर, एक थ्रश पक्षी आणि एक सोनेरी कोंबडा जंगलातील एका लहानशा घरात एकत्र रहात होते. जेव्हा मांजर आणि थ्रश पक्षी लाकडे तोडायला दाट जंगलात जात, तेव्हा कोंबडा घरी एकटाच रहात असे

जाण्यापूर्वी ते कोंबड्याला नेहमी बजावत असत,

‘आम्ही लांब जाणार आहोत, त्यामुळे तू घरीच थांबून लक्ष ठेव. कोणताही आवाज करू नकोस आणि जर कोल्हीण आली तर खिडकीतून बाहेर पाहू नकोस.

कोल्हीणीला कळते की मांजर आणि थ्रश पक्षी बाहेर गेले आहेत. म्हणून ती त्या लहानशा घरात धावत जाते, खिडकीखाली बसते आणि गाऊ लागते:


कोंबड्या कोंबड्या,
सोनेरी मान,
लोण्यासारखे मुलायम डोके ,
रेशमी दाढी,
खिडकीतून बाहेर बघ,
मी तुला थोडे वाटाणे देईन .

कोंबड्याने खिडकीतून डोके बाहेर काढले आणि कोल्हीणीने लगेच त्याला आपल्या गुहेत नेण्यासाठी नखांनी पकडले.

कोंबडा मोठ्याने ओरडू लागतो:

घनदाट जंगल, खळाळणाऱ्या नद्या
उंच पर्वत ओलांडून
कोल्हीण मला घेऊन जात आहे
मांजर आणि थ्रश पक्षी, मला वाचवा !

मांजर आणि थ्रश पक्ष्याने त्याचे ओरडणे ऐकले. त्याचा पाठलाग केला आणि कोल्हीणीपासून कोंबड्याला वाचवले.



दुसऱ्या वेळी, मांजर आणि थ्रश पक्षी लाकडे तोडण्यासाठी जंगलात गेले आणि त्यांनी पुन्हा कोंबड्याला सावध केले:

‘कोंबड्या लक्ष देऊन ऐक, खिडकीतून बाहेर पाहू नकोस. यावेळी आम्ही आणखी दूर जाणार आहोत. आम्हाला तुझा आवाज ऐकू येणार नाही.’ ते दोघे जातात. कोल्हीण घरी परत येऊन गाऊ लागते:


‘कोंबड्या कोंबड्या,
सोनेरी मान,
लोण्यासारखे मुलायम डोके,
रेशमी दाढी,
खिडकीतून बाहेर बघ,
तुला थोडे वाटाणे देते.’

कोंबडा गप्प राहिला. पण कोल्हीण पुन्हा गाऊ लागते :

‘मुले धावत आहेत.
दाणे टाकले आहेत,
कोंबड्या दाणे टिपत आहेत.
तुला काहीच मिळणार नाही.’

कोंबड्याने खिडकीतून डोके बाहेर काढले:

कुकडू -कुक ! कोंबड्याला काहीच कसं मिळत नाही ?



कोंबड्याने खिडकीतून डोके बाहेर काढले आणि कोल्हीणीने लगेच त्याला आपल्या गुहेत नेण्यासाठी नखांनी पकडले.

कोंबडा मोठ्याने ओरडू लागतो:

घनदाट जंगल, खळाळणाऱ्या नद्या
उंच पर्वत ओलांडून
कोल्हीण मला घेऊन जात आहे
मांजर आणि थ्रश पक्षी, मला वाचवा !

मांजर आणि थ्रश पक्ष्याने त्याचे ओरडणे ऐकले.

मांजर पळाली; थ्रश पक्षी उडाला ... त्यांनी कोल्हीणीला पकडले—मांजराने त्याला ओरखडले, थ्रश पक्ष्याने त्याला चोच मारली आणि त्यांनी कोंबड्याला पुन्हा वाचवले.

लाकडे तोडण्यासाठी ते पुन्हा जंगलात गेले . यावेळी निघण्यापूर्वी त्यांनी कोंबड्याला एक कडक ताकीद दिली:

कोल्हीणीचे ऐकू नकोस. खिडकीतून बाहेर पाहू नकोस. यावेळी आम्ही आणखी पुढे जाणार आहोत, आणि आम्हाला तुझा आवाज ऐकू येणार नाही .

कोल्हीण पुन्हा आली. ती खिडकीखाली बसून गाऊ लागली.

'कोंबड्या कोंबड्या,
सोनेरी मान,



लोण्यासारखे मुलायम डोके ,
रेशमी दाढी,
खिडकीतून बाहेर बघ,
तुला थोडे वाटाणे देते.'
कोंबडा गप्प राहिला. पण कोल्हीण पुन्हा गाऊ लागते :
'मुले धावत आहेत.
दाणे टाकले आहेत,
कोंबड्या दाणे टिपत आहेत.
तुला काहीच मिळणार नाही.'
कोंबडा गप्प राहिला. पण कोल्हीण पुन्हा गाऊ लागते :
लोक पळून जात आहेत.
सुकामेवा विखुरलेला आहे .
कोंबड्या टिपत आहेत.
तुला काही मिळणार नाही ..."

कोंबड्याला काहीच कसं मिळणार नाही?




कोंबड्याने खिडकीतून डोके बाहेर काढले आणि कोल्हीणीने लगेच त्याला आपल्या गुहेत नेण्यासाठी नखांनी पकडले.

अंधाऱ्या जंगलांमधून, वेगवान नद्या, उंच पर्वत ओलांडून आपल्या गुहेत नेऊ लागली.

कोंबडा मोठ्याने ओरडला आणि किंचाळला पण मांजर आणि थ्रश पक्ष्याने ते ऐकले नाही. जेव्हा ते घरी परतले, तेव्हा कोंबडा तिथे नव्हता

मांजर आणि थ्रश पक्षी कोल्हीणीच्या पावलांचे ठसे शोधत गेले. मांजर धावले; थ्रश पक्षी उडाला ... मग ते कोल्हीणीच्या गुहेपाशी पोहोचले. मांजराने एक लहान वीणा बाहेर काढली आणि ती वाजवू लागली .

प्लिंक, प्लॉन्क, लहानशी वीणा,
सोन्याची तार...
कोल्ह्यांची राणी घरी आहे का ?
तुमच्या आरामदायी छोट्याशा घरात ?




कोल्हीणीने ऐकले आणि विचार केला:

इतक्या मधुरपणे वीणा वाजवत आहे .


आणि तो किती सुंदर गात आहे .

ती तिच्या गुहेतून बाहेर सरपटत आल्याबरोबर , मांजर
आणि थ्रश पक्ष्याने तिला लगेच पकडले. ती घाबरून पळून गेली.



मग त्यांनी त्या कोंबड्याला उचलले, एका टोपलीत ठेवले आणि घरी आणले.

आणि तेव्हापासून ते आतापर्यंत आनंदाने जगत आहेत .



गोल्डन रुस्टर

रशियन परीकथा

Edited by Evgeny Spirin
Layout by Arvind Gupta, Evgeny Spirin
International project:
"Mini Progress and Mini Raduga"

MINI PROGRESS & MINI RADUGA